# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६२०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :२/एनजीपी/२००३/डिफार्म-मान्यता/ ७८४०
दिनांक : 18 सितम्बर SEP 2003

प्रति
प्राचार्य,
वैनगंगा बहुद्देशिय विकास संस्थेचे
बाजीराव करंजकर कॉलेज ऑफ फार्मसी,
नागझरी रोड, साकोली, जि. भंडारा.

विषय:- शैक्षणिक वर्ष २००३-०४ साठी विना अनुदान तत्वावर, औषधनिर्माणशास्त्र हा पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत...

संदर्भ:- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक: मान्यता २००३/(प्र.क्र.१४९/०३)/तांशि-२, दिनांक १९.०७.२००३

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००३-२००४ साठी विना अनुदान तत्वावर खालील पदविका अभ्यासक्रम त्यांच्यासमोर दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | औषधनिर्माणशास्त्र पदविका | ६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींचे पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर करावे लागेल तसेच संस्थाचालक व संबंधित सहसंचालक यांच्या संयुक्त खात्यात शासन जी रक्कम विहित करेल ती भरणे संस्थेवर बंधनकारक आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून उपरोक्त नमूद केलेला अभ्यासक्रम सन २००३-२००४ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१अ, दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.

३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावे. शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर उचित कारवाई करण्यात येईल.

४. संस्थेने औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी संस्थाचालक आणि मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात नियतठेव म्हणून रु.५.८० लाख भंडारा ग्रामीण बँक शाखा साकोली येथे पावती क्रमांक ईबीडी/जेओ-२६८१४ अन्वये दिनांक ११.०९.२००३ अन्वये ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच व्दितीय वर्षासाठी संयुक्त खात्यात रुपये ५.०० लाख भरावे लागतील.

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई व सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क शासन मंजूरीप्रमाणे आकारण्यात यावे.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके इ. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. या संचालनालयाने किंवा सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई किंवा त्यांच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरिक्षणांती संस्थेस आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

९. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१०. संस्थेला सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

११. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फि किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१२. शासनाने, या संचालनालयाने व सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे सं__ा उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास राहतील.

१३. संस्थेला फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांची मान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांनी संस्थेस मान्यता नाकारल्यास संस्था बंद करावी लागेल.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.

( प्रा. न. बा. [illegible]कर )
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:
१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच संदर्भात माहितीसाठी सादर.
२. सचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, नागपूर.
४. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर यांना माहितीस्तव सादर.
५. श्री. एन.बी. पाटील, सिस्टिम ॲनालिस्ट यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
६. कार्यासन क्रमांक १० मुख्य कार्यालय,मुंबई.
७. निवड नस्ती.

C:\mahesh v purandare\dip ordres 2003-04\Polytechnic Orders 2002-2003.doc

Officiating Principal
Rajiraoji Karanjekar
College of [illegible]